**मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेंतर्गत राज्यातील पात्र लाभार्थ्यांना वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण (Refill) मोफत उपलब्ध करून देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-घगॅस-२०२४/प्र.क्र.५८/नापु-२७**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ३० जुलै, २०२४.

**संदर्भ**:- १. मा.मंत्रीमंडळ सचिव यांचे दि.२४.०७.२०२४ रोजीचे पत्र
(मा.मंत्रीमंडळ बैठक दि.११.०७.२०२४, विषय क्र.७)
२. महिला व बाल विकास विभाग, शा.नि. क्र.मबावि-२०२४/प्र.क्र.९६/कार्या.-२, दि.२८.०६.२०२४.

**प्रस्तावना:-**

देशातील स्त्रियांना धुरमुक्त वातावरणात जगता यावे, देशातील गरीब कुटूंबांना स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन पुरविणे, तसेच गरीब कुटुंबातील महिलांच्या आरोग्यमानात सुधारणा करुन स्त्री सक्षमीकरण करणे, या उद्देशाने केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री उज्ज्वला योजना सन-२०१६ मध्ये सुरु करण्यात आली. सदर योजनेंतर्गत महाराष्ट्रातील पात्र कुटुंबांना गॅसजोडणी देण्याचे काम तेल कंपन्यांच्या सहकार्याने सुरु आहे. महाराष्ट्रात सद्य:स्थितीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत गॅसजोडणी घेतलेले तसेच, सदर योजनेच्या व्यतिरिक्त अन्य गरीब प्रवर्गातील गॅसजोडण्या असलेल्या काही लाभार्थ्यांना बाजार दराने गॅसजोडण्यांचे पुनर्भरण करणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. तसेच, एक सिलिंडर संपल्यानंतर दुसरे सिलिंडर उपलब्ध होईपर्यंत स्वयंपाकाकरिता साधन उपलब्ध नसल्यामुळे, परिणामी ते वृक्षतोड करुन पर्यावरणास हानी पोहोचवित असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

सदर बाब विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाचा सन २०२४-२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करताना **मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेची** घोषणा करण्यात आली आहे. उपरोक्त घोषणेच्या अनुषंगाने राज्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना तसेच, मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनाही वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण (Refill) मोफत उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे ५२.१६ लक्ष लाभार्थ्यांना तसेच मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाला वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण (Refill) मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर योजना **"मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना"** या नावाने राबविण्यात येईल.

## १. लाभार्थ्यांची पात्रता:-

- सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅसजोडणी महिलेच्या नावाने असणे आवश्यक आहे.
- सद्य:स्थितीत राज्यात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत पात्र असलेले सुमारे ५२.१६ लक्ष लाभार्थी सदर योजनेसाठी पात्र असतील.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे कुटूंब सदर योजनेस पात्र असेल.
- एका कुटूंबात (रेशन कार्डनुसार) केवळ एक लाभार्थी सदर योजनेस पात्र असेल.
- सदर लाभ केवळ १४.२ कि. ग्रॅ. वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅसधारकांना अनुज्ञेय असेल.

## २. योजनेची कार्यपध्दतीः-

### अ. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती.

i. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस सिलेंडरचे नियमित वितरण हे तेल कंपन्यांमार्फत करण्यात येते. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेंतर्गत द्यावयाच्या ३ मोफत सिलेंडरचे वितरणही तेल कंपन्यांमार्फत करण्यात येईल.

ii. सद्यःस्थितीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत वितरीत होणाऱ्या गॅस सिलेंडरची बाजारभावाची संपूर्ण रक्कम (सरासरी रु.८३०/-) ग्राहकांकडून घेतली जाते. तद्नंतर केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत देण्यात येणारी (रु.३००/-) सबसिडी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते.

iii. त्याच धर्तीवर तेल कंपन्यांनी राज्य शासनाकडून द्यावयाची अंदाजे रू.५३०/- प्रति सिलेंडर, इतकी रक्कम ग्राहकांच्या बँक खात्यामध्ये जमा करावी. तेल कंपन्यांकडून राज्य शासनाच्या योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी कंपन्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. तसेच, लाभार्थ्यांची माहिती दर आठवड्याला शासनास उपलब्ध करून द्यावी.

iv. तसेच सदर योजनेत ग्राहकास एका महिन्यात एकापेक्षा अधिक सिलेंडरसाठी सबसिडी देण्यात येणार नाही.

v. जिल्हानिहाय सिलेंडरच्या किंमतीत फरक आहे. सबब, अंतिमतः तेल कंपन्यांकडून वितरित करण्यात आलेल्या सिलेंडरच्या किंमतीच्या आधारावर, तसेच जिल्हानिहाय सिलेंडरच्या किंमतीच्या आधारावर, प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम तेल कंपन्यांना अदा करण्यात येईल.

vi. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी तेल कंपन्यांकडून जिल्हानिहाय

लाभार्थ्यांना वितरित केलेल्या सिलिंडर तपशिलाची प्रमाणित यादी, तसेच तेल कंपनीस प्रदान करावयाच्या रकमेच्या शिफारशीसह देयक, वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांना सादर करावे. लाभार्थ्यांची व्दिरुक्ती होणार नाही, याची खातरजमा करुन देयक प्रदानार्थ वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्यात यावे. तेल कंपन्यांना जिल्हानिहाय अंतिम रकमेचे प्रदान करण्याची जबाबदारी वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अनापुवग्रासंवि यांची राहिल.

**ब. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती.**

i. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेंतर्गत द्यावयाच्या ३ मोफत सिलेंडरचे वितरण तेल कंपन्यांमार्फत करण्यात येईल.

ii. सदर योजनेत ग्राहकास एका महिन्यात एकापेक्षा अधिक सिलेंडरसाठी सबसिडी देण्यात येणार नाही.

iii. या विभागामध्ये प्रशासकीय सोयीसाठी मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे शहरी क्षेत्रामध्ये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र तसेच अन्य जिल्ह्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत पुरवठा यंत्रणा कार्यरत आहे. सबब, मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांमधून गॅस सिलेंडरसाठी पात्र लाभार्थी निवडण्यासाठी मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात यावी:-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १. | नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई | अध्यक्ष |
| २. | मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रामधील समन्वयक, तेल कंपन्या | सदस्य |
| ३. | मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व जिल्हा महिला बालविकास अधिकारी | सदस्य |
| ४. | मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रामधील सर्व तेल कंपन्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | शिधावाटप अधिकारी, नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालय, मुंबई | सदस्य |
| ६. | उपनियंत्रक, नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालय, मुंबई | सदस्य सचिव |

iv. तसेच, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र व अन्य जिल्हयांसाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात यावी :-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १. | सबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी/अप्पर जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा महिला बालविकास अधिकारी | सदस्य |
| ३. | तेल कंपन्यांचे जिल्हा समन्वयक | सदस्य |
| ४. | जिल्हयातील सर्व तेल कंपन्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी/सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी | सदस्य |
| ६. | जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी | सदस्य सचिव |

v. उपरोक्त समित्यांची कार्यकक्षा:-
- मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे (रेशन कार्डनुसार) कुटूंब निश्चित करणे.
- योजनेतील लाभार्थ्यांची व्दिरुक्ती होणार नाही, याबाबतची दक्षता घेणे.
- सर्व निकषांची पुर्तता करणाऱ्या लाभार्थ्यांची आधार प्रमाणित अंतीम यादी, आधार संलग्न बँकखाते क्रमांकासह निश्चित करणे.

vi. उपरोक्त समितीने निश्चित केलेल्या मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची कुटूंबनिहाय माहिती नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई /जिल्हा पुरवठा अधिकारी /अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील तेल कंपन्यांना द्यावी.

vii. सदर प्राप्त माहितीनुसार तेल कंपन्यांनी प्रत्येक लाभार्थी कुटूंबास प्रतिवर्षी ३ गॅस सिलेंडर बाजार दराने उपलब्ध करून द्यावेत. ज्या पात्र कुटूंबांनी मोफत द्यावयाच्या सिलेंडरचे पुनर्भरण केले आहे, त्या कुटुंबांची माहिती कंपन्यांनी दर आठवड्याला संबंधित पुरवठा यंत्रणेस द्यावी.

viii. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना व मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना या दोन योजनेंच्या लाभार्थ्यांमध्ये सिलेंडरचा लाभ देताना व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता संबंधित पुरवठा यंत्रणा तसेच तेल कंपन्यांनी घ्यावी.

ix. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा/जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी तेल कंपन्यांकडून प्राप्त जिल्हानिहाय पात्र लाभार्थ्यांच्या माहितीची खातरजमा करून, तसेच त्यास उपरोक्त समितीची मान्यता घेऊन ती लाभार्थ्यांची माहिती वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अनापुवग्रासंवि, ८ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, लो.टि. मार्ग, मुंबई-०१ यांना द्यावी.

x. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेमध्ये तेल कंपन्यांनी प्रथम ३ सिलेंडरसाठी लाभार्थ्यांकडून गॅस सिलेंडरची संपूर्ण रक्कम वसूल करावी. तद्नंतर राज्य शासनाकडून द्यावयाची संपूर्ण रक्कम, म्हणजेच अंदाजे रू.८३०/- प्रति सिलेंडर, इतकी रक्कम वित्तीय सल्लागार व

उपसचिव कार्यालय, अनापुवग्रासंवि यांनी ग्राहकांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणाव्दारे ( Direct Benefit Transfer (DBT)) व्दारे जमा करावी.

xi. जिल्हानिहाय सिलेंडरच्या किंमतीत फरक आहे. सबब, अंतिमत: तेल कंपन्यांकडून वितरित करण्यात आलेल्या सिलेंडरच्या किंमतीच्या आधारावर, तसेच जिल्हानिहाय सिलेंडरच्या किंमतीच्या आधारावर, प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम ग्राहकांना अदा करण्यात येईल.

xii. महा-आयटी (Maha-IT) यांचे मार्फत क्षेत्रिय स्तरावर व वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई कार्यालयास स्वतंत्र Login उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार तांत्रिक सहकार्य महा-आयटी (Maha-IT) यांनी उपलब्ध करुन द्यावे. सर्व संबंधित क्षेत्रिय कार्यालयांनी Direct Benefit Transfer (DBT) करावयाच्या लाभार्थ्यांची यादी, विभागाने निश्चित केलेल्या तपशीलानुसार पडताळणी करुन Login मध्ये प्रदानाकरीता वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करावी. लाभार्थ्यांची द्विरुक्ती होणार नाही याबाबत संबंधित क्षेत्रिय कार्यालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी. क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त तपशीलानुसार Direct Benefit Transfer (DBT) करावयाची कार्यवाही वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई कार्यालयाने करावी.

xiii. या शासन निर्णयाप्रमाणे दि.०१ जुलै, २०२४ रोजी पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनाच सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

xiv. दिनांक ०१ जुलै, २०२४ रोजीनंतर विभक्त केलेल्या शिधापत्रिका सदर योजनेस पात्र ठरणार नाहीत.

**३.** सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी, ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करणे, तेल कंपन्यांना करावयाच्या प्रतीपूर्तीसंदर्भातील तक्रारींचे निराकरण करणे तसेच योजनेच्या एकूण संचालन व समन्वयासाठी नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ३ | वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अनापुवग्रासंवि, मुंबई | सदस्य |
| ४ | राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ५ | सर्व तेल कंपन्यांचे राज्यस्तरीय प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | उपनियंत्रक (अंमल), नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई कार्यालय | सदस्य सचिव |

४. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेसाठी होणारा खर्च “मागणी क्र.एम-२, ०१ अन्न, १०१ खरेदी आणि पुरवठा, ०३-खरेदी, वितरण आणि किंमत नियंत्रण, २४०८०८७९ या लेखाशिर्षाखाली मंजूर झालेल्या अनुदानातुन भागविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने तसेच वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२७०/व्यय-१० दि.२९.०७.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७३०११५०४५३९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TATOBA MARUTI KOLEKAR

Digitally signed by TATOBA MARUTI KOLEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Food Civil Supplies and Consumer Protection Depart, 2.5.4.20=f6809ddecc0e0507860e37e9935ab3a7013510f4fe04fad27512588a0bc8e15f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9915405908628d01955f3675acc122f51e0c39f63f7cc88eec49cd05616991fd, cn=TATOBA MARUTI KOLEKAR
Date: 2024.07.30 12:05:57 +05'30'

**( तातोबा कोळेकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा / विधान परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्मानीय विधानसभा / विधान परिषद सदस्य,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उपमुख्यमंत्री (नियोजन व वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून),
१०.नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुंबई,
११.नियंत्रक, वैधमापनशास्त्र, मुंबई,
१२.वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
१४.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
१५.राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६.सर्व उप आयुक्त (पुरवठा) ,
१७. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
१८. सर्व अन्न धान्य वितरण अधिकारी,
१९.निवडनस्ती (कार्यासन नापु-२७).